# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 2 री

**प्र. 1. (अ)**

(1) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे अलेक्झांडर कनिंगहॅम हे पहिले सरसंचालक होत.

(2) सातारा जिल्ह्यातील कास पठार हे पश्चिम घाटरांगांमधील ठिकाण युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारशाच्या यादीत समाविष्ट आहे.

(3) ऑलिम्पिक स्पर्धांची परंपरा ग्रीस येथे सुरू झाली.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**

(1) द्वंद्ववादी पद्धती – हिरोडोटस

(2) संगीत शारदा – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

(3) महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली.

**प्र. 2. (अ)**

**(1)** **सांस्कृतिक वारसा**


| मूर्त | अमूर्त |
|---|---|
| (१) प्राचीन स्थळे | (१) मौखिक परंपरा व ती उपयोगात आणली जाणारी भाषा |
| (२) प्राचीन वास्तू | (२) पारंपरिक ज्ञान |
| (३) प्राचीन वस्तू | (३) सणसमारंभाच्या सामाजिक पद्धती व धार्मिक विधी |
| (४) हस्तलिखिते | (४) कला सादरीकरणाच्या पद्धती |
| (५) प्राचीन शिल्पे | (५) पारंपरिक कौशल्ये |
| (६) प्राचीन चित्रे | (६) परंपरा, पद्धती, कौशल्ये आत्मसात असणारे समूह व गट |

(**टीप :** *दोन्ही गटांतील प्रत्येकी दोन वारशांची उदाहरणे लिहिणे अपेक्षित आहे.*)

**(2) भारतीय दूरदर्शनच्या विकासाचे टप्पे :**

| इ. स. १९५९ | इ. स. १९७२ | इ. स. १९८२ | इ. स. १९९१ |
|---|---|---|---|
| दिल्ली दूरदर्शनची सुरुवात | मुंबई दूरदर्शन केंद्र सुरू | भारतात रंगीत दूरदर्शनचे आगमन | खासगी वाहिन्यांना परवानगी |

(3)




प्र. 2. (ब)

**(1) द्वंद्ववाद :**

(१) एखादया घटनेचा अर्थ लावण्यासाठी परस्परविरोधी असे दोन सिद्धांत मांडून त्यांतून योग्य तर्क लावला जातो. या मांडणीला 'द्वंद्ववाद' असे म्हणतात. जॉर्ज हेगेल याने या सिद्धांताची मांडणी केली.

(२) दोन्ही परस्परविरोधी सिद्धांतांची उलटसुलट चर्चा केल्यावर दोन्ही सिद्धांतांतील सार असलेली समन्वयात्मक मांडणी करता येते. असे न केल्यास मानवी मनाला त्या घटनेचे नीट आकलन होत नाही.

**(2) रंगभूमी व चित्रपट या क्षेत्रांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे :**

रंगभूमी आणि चित्रपट यांच्याशी संबंधित पुढील अनेक व्यावसायिक क्षेत्रे आहेत–

(१) रंगभूमीसाठी नेपथ्य, वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा करणाऱ्या अनेक तज्ज्ञांची गरज असते. दिग्दर्शक, कलाकार, छाया व प्रकाशयोजना करणारे तंत्रज्ञ व साहाय्यक यांची गरज असते. लेखक, त्यांचे सल्लागार, संगीत व भाषा यांतील जाणकार या सर्वांची आवश्यकता असते.

(२) चित्रपटासाठीही या सर्वांची आवश्यकता असते; त्याचबरोबर कॅमेरामन, संवादलेखक, कथालेखक, नृत्य दिग्दर्शक, गीतकार अशा तज्ज्ञांची आवश्यकता असते. ही सर्व व्यावसायिक क्षेत्रे रंगभूमी व चित्रपट या क्षेत्रांशी संबंधित अशी आहेत.

**(3) मराठी विश्वकोश :**

(१) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६० साली 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळा'ची स्थापना केली.

(२) मराठी भाषा व साहित्य यांच्या विकासासाठी मराठी विश्वकोश निर्मितीस चालना देणे हा त्यामागे उद्देश होता.

(३) या मंडळाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची विश्वकोशाच्या प्रमुख संपादकपदी नेमणूक केली. मराठी विश्वकोशाचे आजपर्यंत २० खंड प्रसिद्ध झाले आहेत.

(४) मराठी विश्वकोश हा सर्व विषय संग्राहक असून जगभरातील ज्ञान साररूपाने त्यात आणलेले आहे. इतर विषयांप्रमाणेच इतिहास विषयाशी निगडित असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदीदेखील या विश्वकोशात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**प्र. 3.**

**(1)** व्हॉल्टेअरच्या मते –

(१) इतिहासलेखनासाठी वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम एवढ्यावरच इतिहासलेखकाने लक्ष केंद्रित करू नये.

(२) त्याबरोबरच तत्कालीन समाजाच्या परंपरा, शेती, व्यापार व आर्थिक व्यवस्था यांचा विचारही होणे आवश्यक आहे.

(३) या त्याच्या मतामुळे इतिहासाची मांडणी करताना मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार व्हायला हवा, हा नवीन विचार पुढे आला.

म्हणून व्हॉल्टेअर याला 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' असे म्हटले जाते.

**(2)** (१) पूर्वजांनी निर्माण केलेल्या कलाकृती, परंपरा हा आपला सांस्कृतिक वारसा असून त्यांविषयी आपल्या मनात आपुलकी असते.

(२) हा वारसा पुढील मानवी पिढ्यांच्या हितासाठी जपणे व त्याचे संवर्धन होणे गरजेचे असते.

(३) काळाच्या ओघात हा ठेवा नामशेष होता कामा नये.

(४) यासाठी त्याचे जतन कसे करावे, याच्या दिशादर्शक तत्त्वांच्या आधाराने जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे व परंपरा यांची यादी 'युनेस्को' या जागतिक संघटनेकडून जाहीर केली जाते.

**(3)** भारताला संपन्न असा नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. हा वारसा आपण जपला पाहिजे; कारण –

(१) आपल्या ऐतिहासिक वास्तू, किल्ले, ठिकाणे ही भावी पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहेत. या ऐतिहासिक वारशामुळे आपल्याला प्रेरणा व स्फूर्ती मिळते.

(२) विविधतेने नटलेल्या भारतात अनेक नद्या, पर्वत, जंगले, अभयारण्ये, समुद्रकिनारे आहेत व ते पाहण्यासाठी हजारो पर्यटक परदेशातून येतात.

(३) भारतीय नृत्य, साहित्य, विविध कला, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्यासाठी जगभरातील लोक भारतात येतात.

(४) आपला नैसर्गिक आणि पूर्वजांनी दिलेला सांस्कृतिक वारसा हे आपले वैभव असून तो पुढील पिढ्यांसाठी आपण जपला पाहिजे.

**(4)** ग्रंथालये आणि संग्रहालये ही राष्ट्राचा चालताबोलता जिवंत इतिहास असतो. त्यामुळे राष्ट्रासाठी त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असते–

(१) ग्रंथालये व संग्रहालये यांच्यामुळे अभ्यासकाला इतिहासलेखन करणे सुलभ जाते. इतिहासाबद्दलच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनात बदल होतो.

(२) ऐतिहासिक घटना व व्यक्तींची चरित्रे सामान्य लोकांपर्यंत पोहोचतात. प्राचीन ऐतिहासिक साधनांचे जतन होते.

(३) भूतकालीन सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना येते.

(४) वस्तुसंग्रहालये पाहिल्याने कला व अभिरुची यांत वाढ होते. ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसाराला हातभार लागतो.

म्हणून ग्रंथालये आणि संग्रहालये राष्ट्रासाठी आवश्यक असतात.

**प्र. 4.**

**(1)** हेमाडपंती मंदिरांच्या बाह्यभिंती बऱ्याचदा तारकाकृती असतात.

**(2)** मुंबईजवळील अंबरनाथ येथील अंब्रेश्वर, नाशिकजवळ सिन्नर येथील गोंदेश्वर, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ही हेमाडपंती मंदिरांची उदाहरणे आहेत.

**(3)** (१) हेमाडपंती मंदिरांच्या बांधणीत प्रामुख्याने तारकाकृती बांधकाम आढळते. यामुळे मंदिराची बाह्यभिंत अनेक कोनांमध्ये विभागली जाते.

(२) त्यामुळे मंदिरांच्या भिंती व त्यावरील कोरीव शिल्पे यांच्यावर छायाप्रकाशाचा सुंदर परिणाम पाहायला मिळतो.

(३) या स्थापत्यशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भिंतींचे दगड सांधण्यासाठी चुना किंवा माती न वापरता दगडांमध्ये एकमेकांत घट्ट बसणाऱ्या खोबणी आणि कुसू यांच्या आधारे भिंती उभारण्यात येतात.

**प्र. 5.**

**(1)** भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र आणि इतिहासलेखन यांत मूलभूत संशोधन करणाऱ्या वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान पुढीलप्रमाणे–

(१) राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड संपादित केले.

(२) इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय, हा विचार मांडला.

(३) केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी केलेली कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती म्हणजे इतिहास नव्हे, असे त्यांचे मत होते.

(४) आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, हा विचार त्यांनी भारतीय इतिहासकारांना दिला.

(५) अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला गेला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते.

(६) स्थळ, काळ व व्यक्ती या त्रयींनी बद्ध झालेल्या मानवी प्रसंगांचे वर्णन इतिहासलेखनात असायला हवे, असे त्यांचे मत होते.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेले ऐतिहासिक लेखन व मांडलेली मते हे इतिहासलेखनाला दिलेले मोठे योगदान आहे.

**(2)** स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक उद्देशांच्या पूर्तीसाठी जी वृत्तपत्रे सुरू झाली, त्यात 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचा समावेश होतो. गोपाळ गणेश आगरकर आणि लोकमान्य टिळक यांनी 'केसरी' व 'मराठा' ही वृत्तपत्रे १८८१ साली सुरू केली. या वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महत्त्वपूर्ण योगदान आहे.

(१) या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांत जागृती घडवून आणली. तत्कालीन सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडली.

(२) तत्कालीन देशस्थितीवर प्रकाश टाकून सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर विचारमंथन केले.

(३) बालविवाह, पुनर्विवाह अशा विषयांवर मते मांडली.

(४) देशभाषेतील ग्रंथ, पाश्चात्त्य ग्रंथ, विद्या यांवर चर्चा केली व त्यांतील विचार लोकांपर्यंत पोहोचवले.

(५) एतद्देशीय आणि विलायतेतील राजकारण यांसंबंधी लेखन केले.

(६) ज्ञानप्रसाराबरोबरच नीतिमूल्यांची जोपासना केली. वाईट रूढी-परंपरा यांच्यावर प्रखर टीका करून समाजप्रबोधन केले.

**(3)** खेळांशी संबंधित साहित्य ही एक नवी ज्ञानशाखाच निर्माण झालेली आहे. भारतात विविध खेळांवर विपुल लेखन केले जाते.

(१) खेळांशी संबंधित अनेक पुस्तके व आत्मचरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. खेळांविषयीचे कोश लिहिले जात आहेत.

(२) व्यायाम या विषयावर स्वतंत्र शब्दकोश तयार झालेला आहे. मल्लखांबाचा इतिहास प्रकाशित झालेला आहे.

(३) खेळांवर लेखन असणारी स्वतंत्र क्रीडामासिके, पाक्षिके प्रसिद्ध होत असतात. दैनंदिन वृत्तपत्रांमध्ये एक वा दोन संपूर्ण पाने क्रीडाजगतासाठीच राखून ठेवलेली असतात.

(४) 'षट्कार' नावाचे खेळाला वाहिलेले नियतकालिक पूर्वी प्रसिद्ध होत असे. द्वारकानाथ संझगिरी, शिरीष कणेकर असे अनेक लेखक क्रिकेट आणि अन्य खेळांवर वृत्तपत्रांमधून लेखन करीत असतात.

(५) इंग्रजी भाषेत तर क्रीडाक्षेत्रावर प्रचंड प्रमाणात लेखन होत असते.

(६) अन्य प्रादेशिक भाषांमधूनही क्रीडालेखन होते. ही सर्व माहिती म्हणजे खेळांच्या साहित्याचा इतिहासच आहे.

**(4)** (१) पर्यटनस्थळांच्या परिसरात बाजारपेठांचा विस्तार होऊन वस्तूंच्या खरेदी-विक्रीत वाढ होते.

(२) पर्यटकांना आवडणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीत वाढ होते, त्यामुळे स्थानिक हस्तोद्योग व कुटीरोद्योगांचा विकास होतो. स्थानिक खाद्यपदार्थ, हॉटेल व्यवसाय व निवासी व्यवस्था या व्यवसायांचा विकास होतो.

(३) प्रवाशांच्या वाहतुकीसाठी बस, रिक्षा, टॅक्सी अशा वाहतूक क्षेत्रातील व्यवसाय वाढतात.

(४) प्रवासी एजंट, पर्यटन मार्गदर्शक (गाईड), फोटोग्राफर इत्यादी नवे रोजगार निर्माण होतात.

थोडक्यात, पर्यटन व्यवसायामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होते.

**प्र. 6.**

(1) हुंडा प्रतिबंधक कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वतःचा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे.

(2) लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान चूक आहे; कारण–

(१) भारताची प्रचंड लोकसंख्या आणि देशाचा मोठा विस्तार लक्षात घेता विविध पातळींवर निवडणुका घेणे, ही बाब आव्हानात्मक आहे. हे आव्हान भारतीय लोकशाहीने यशस्वी केलेले आहे.

(२) ठरावीक मुदतीनंतर देशात मुक्त आणि न्याय्य वातावरणात निवडणुका घेणे, हे लोकशाहीचे यश आहे.

(३) कालबद्ध होणाऱ्या निवडणुकांमुळे मतदारांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ झाल्या आहेत; त्यामुळे मतदान करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झालेली दिसते. जनतेच्या या राजकीय सहभागाचा विचार करता भारतीय लोकशाही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसते.

**(2)** हे विधान चूक आहे; कारण–

(१) सत्ता मिळवणे हे विविध राजकीय पक्षांचे उद्दिष्ट असते.

(२) सत्ताप्राप्तीसाठी त्यांना विविध उपक्रम आणि कार्यक्रम राबवून लोकांचा पाठिंबा मिळवावा लागतो.

(३) जनहिताचे प्रश्न सोडवणाऱ्या पक्षांनाच लोकांचा पाठिंबा मिळतो. या पाठिंब्याशिवाय पक्षाला सत्ता हस्तगत करता येत नाही; म्हणून राजकीय पक्षांना लोकांच्या पाठिंब्याची गरज असते.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण–

(१) सार्वजनिक प्रश्नांच्या निराकरणासाठी एक वा अनेक व्यक्ती संघटित होऊन सामूहिक आंदोलन उभे करतात.

(२) सामाजिक प्रश्नांसंदर्भातील सर्व माहिती आंदोलनातील कार्यकर्ते शासनाला देत असतात.

(३) चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे शासनाला त्याची दखल घ्यावीच लागते.

(४) शासनाच्या निर्णयांना, धोरणांना विरोध करण्यासाठी चळवळी उभ्या राहतात. लोकशाही पद्धतीतच जनतेला प्रतिकार करण्याचा हक्क असतो. म्हणून लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

**प्र. 8. (अ)**

**(1) मध्यावधी निवडणुका :**

(१) लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा यांचा कालावधी पाच वर्षे असतो. परंतु काही कारणांमुळे जेव्हा या सभागृहांच्या मुदतपूर्व निवडणुका घ्याव्या लागतात, त्यांना 'मध्यावधी निवडणुका' असे म्हणतात.

(२) बहुमताने अधिकारावर आलेले सरकार मुदतीआधीच पक्षफुटीमुळे अल्पमतात येऊ शकते.

(३) काही वेळा एका पक्षाला बहुमत मिळाले नसल्यास दोन किंवा अनेक पक्षांची आघाडी करून सरकार स्थापन केले जाते. परंतु मुदतीआधीच आघाडीत फूट पडून सरकार अल्पमतात येते.

(४) अल्पमतात आलेल्या सरकारला राजीनामा द्यावा लागतो. अशा वेळी पर्यायी सरकार स्थापन करण्याची शक्यता नसल्यास लोकसभा वा विधानसभा मुदतपूर्व बरखास्त करावी लागते.

अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाला मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतात.

**(2) चळवळीची वैशिष्ट्ये :**

(१) चळवळ ही सामूहिक कृती असून, त्यात लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो.

(२) चळवळीत निश्चित असा एखादा सार्वजनिक प्रश्न हाती घेऊन लोकांचे संघटन उभे केले जाते.


(३) चळवळीला नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्व जेवढे खंबीर तेवढी चळवळीची परिणामकारकता अधिक वाढते.

(४) चळवळीच्या संघटना असतात. या संघटना सातत्याने प्रश्नांचा पाठपुरावा करतात.


(५) संघटनांनी हाती घेतलेले प्रश्न जनतेला आपले वाटले, तरच जनता चळवळीला पाठिंबा देते. म्हणून चळवळीचा निश्चित कार्यक्रम असला पाहिजे.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** मतपत्रिकांऐवजी बॅटरीवर चालणाऱ्या ईव्हीएम मशीनच्या वापरामुळे देशाला पुढील फायदे झाले –

(१) प्रत्येक निवडणुकीत मतपत्रिकांसाठी लागणाऱ्या कित्येक टन कागदाची बचत झाली.

(२) कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या लाकडाची बचत झाल्याने तेवढी वृक्षतोड थांबली; त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण झाले.

(३) मशीनवर उपलब्ध असलेल्या NOTA च्या सोईमुळे कोणत्याही उमेदवाराला मत द्यायचे नसेल, तर हा पर्याय उपलब्ध झाला.

(४) निवडणुकांचे निकाल लवकर लागू लागल्याने कर्मचारी, पोलीस व एकूण व्यवस्थेचा ताण कमी झाला.

**(2)** भारतातील पक्षपद्धतीच्या स्वरूपात पुढील बदल झाले–

(१) स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रात व राज्यांत काँग्रेस हा एकच प्रबळ पक्ष होता.

(२) १९७७ साली सर्व महत्त्वाचे विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी काँग्रेसला आव्हान देऊन पराभूत केले. त्यामुळे एक प्रबळ पक्ष पद्धतीऐवजी द्विपक्ष पद्धतीला महत्त्व आले.

(३) १९८९ च्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर एकाच पक्षाचे सरकार ही बाब संपुष्टात येऊन आघाडी सरकारे अधिकारावर आली.

(४) प्रादेशिक पक्षांना केंद्रात महत्त्व येऊन आघाडी सरकारे स्थिरावली.